**विवरणपत्र-१**

**(मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांनी(मंडळे/ महामंडळे,संचालनालय, आयुक्तालय इ.यांनी माहिती भरून संबंधित प्रशासकीय विभागांकडे पाठवावयाचे विवरणपत्र)**

**माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ प्रमाणे प्रदर्शित करावयाची माहिती**

**विभागाचे नाव:महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, मुंबई.**

**दुय्यम कार्यालयाचे नाव : –**

**वेबसाइट तयार करण्यात आली आहे काय?— नाही.**
**वेबसाइट सुरू केल्याचीतारीख : –**

**वेबसाइट अद्यावत केल्याची तारीख : –**

**विषय : माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ४ अन्वये**

**१. कार्यालयाची रचना, कार्य व कर्तव्ये: वेबसाइट : परिषदेची स्थापना करणे,ती विधिसंस्यापित करणे, आणि विद्यमान मंडळ व शाखा यांचे विसर्जन करणे आणि संचालकाने तात्पुरते प्रशासक म्हणून कार्य करणे.** आयुर्वेद संचालक ह्या परिषदेचे पदसिध्द सदस्य आहेत.

**२. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये**

**३. निर्णय घेण्याची कार्यपध्दती,पर्यवेक्षण व उत्तरदायित्वाची प्रणाली**

१.अ) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८२ यांच्या प्रारंभाच्या तारखेस महाराष्ट्र भारतीय औषध परिषद म्हणून संबोधली जाणारी एक परिषद स्थापन करण्यात आल्याचे मानण्यात येईल.
ब) परिषद ही पूर्वोक्त नावाची एक विधिसंस्थापित संस्था असेल, तिची परंपरा अखंड असेल आणि तिची एम सामाईक मुद्रा असेल व तिला मालमत्ता संपादन करण्याचा; ती धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल, तिला त्या नावाने दावा लावता येईल आणि तिच्यावर त्या नावाने दावा लावता येईल.

२. कलम ४१, च्या तरतुदींच्या अधीनतेने, विद्यमान मंडळ व शाखा, मह़ाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८२ याच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासूनविसर्जित होतील आणि पूर्वोक्त मंडळाचे व शाखेचे सर्व सदस्य पद रिकामे करतील.

३) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८२ याच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून, आयुर्वेद संचालक हा प्रशासक म्हणून कार्य करील आणि पोट कलम (४) खाली प्रशासकाचे पद तो ज्या मुदतीसाठा धारण करील त्या मुदतीत, तो पोटकलम (१) खाली स्थापन केलेल्या परिषदेचे सर्व अधिकार वापरील आणि परिषदेची सर्व कार्ये पार पाडील.

४) पोट कलम (३) खाली कार्य करणाऱ्या प्रशासकाचा पदावधी, कलमे ३-अ आणि ४ यांच्या तरतुदींनुसार, यथास्थित, नामनिर्दिष्ट केलेल्या किंवा निवडलेल्या परिषद सदस्यांची नावे (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासह) कलम ५ खाली प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी संपेल.

**परिषदेची रचना :-**

३ अ) १) परिषद ही अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासह पुढील सदस्यांची मिळून होईल :-

अ) आयुर्वेद संचालक, पदसिध्द;

ब) राज्य शासनाने नामनिर्दिष्ठ केलेले पाच सदस्य, त्यापैकी दोन अष्टांग आयुर्वेदीय किंवा सिध्द औषध पध्दतीचे व्यवसायी असतील आणि दोन, युनानी किंवा युनानी तिब्ब औषध पध्दतीचे व्यवसायी असतील;

क) नोंदणीकृत व्यवसायींनी निवडलेले पुढीलप्रमाणे नऊ सदस्य, -(एक) नोंदवहीच्या भाग एकमध्ये ज्यांची नावे नोंदलेली असतील त्या नोंदणीकृत व्यवसायींनी त्यांच्यातून निवडलेले (आठ सदस्य);(दोन) नोंदवहीच्या भाग दोनमध्ये ज्यांची नावे नोंदलेली असतील त्या नोंदणीकृत व्यवसायींनी त्यांच्यातून निवडून दिलेला (एक सदस्य)

ड) (एक) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही सांविधिक विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या किंवा यथास्थित अशा विद्यापीठांकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांना बसण्याकरिता भारतीय औषध पध्दतीचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांचे किंवा परिसंस्थाचे प्राचार्य किंवा प्रमुख यांनी आपल्यामधून निवडून दिलेले दोन सदस्य, आणि, (दोन) अशी महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या (प्राचार्य किंवा प्रमुख यांच्या व्यतिरिक्त) अध्यापकांनी आपल्यामधून निवडून दिलेले दोन सदस्य;मात्र असे सदस्य हे अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हतांपैकी कोणतीही अर्हता धारण करणारे व अशा कोणत्याही महाविद्यालयांमध्ये किंवा परिसंस्थामध्ये तीन वर्षाहून कमी नसेल एवढ्या कालावधीसाठी भारतीय औषध पध्दतीपैकी कोणत्याही पध्दतीचे अध्यापन करणारे नोंदणीकृत व्यवसायी असतील. परंतु, या खंडाच्या उपखंड (एक) व (दोन) खाली निवडून द्यावयाचे सदस्य हे, पूर्ववर्ती खंडाखाली नामनिर्देशित केलेल्या किंवा निवडून दिलेल्या व्यक्तीपेक्षा वेगळे असतील.

२) जर कोणत्याही निवडणुकीत, मतदारांनी परिषदेवर आवश्यक तेवढे सदस्य निवडून दिले नाहीत तर

राज्य शासन, निवडणुकीनंतर रिकाम्या राहिलेल्या जागा भरण्याकरता त्याला योग्य वाटतील अशा नोंदणीवृ ृत व्यवसायींचे नामनिर्देशन करील आणि अशा रीतीने नामनिर्देशन केलेले व्यवसायी हे, पोट-कलम (१) खाली रितसर निवडलेले असल्याचे मानण्यात येईल.

३) परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक सदस्य त्यांच्यामधून करतील.

**सदस्य, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीची कार्यपध्दती :**

(४. (१) कलम ३ खाली परिषदेच्या सदस्यांची निवडणूक, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा रीतीने घेण्यात येईल.

परंतु, कलम ३अ, पोट-कलम (१), खंड (क) खालील कोणत्याही निवडणुकीच्या प्रयोजनासाठी कलम २३, पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेली आणि राज्य शासन सर्व साधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत अधिसूवित करील अशा तारखेस (ही तारीख असा आदेश काढल्याच्या तारखेपासून ३० दिवसांपेक्षा अगोदरची नसेल) अंमलात असलेली यादी (रीतसर छापून प्रसिध्द केलेले तिचे पूरकपत्र, किंवा शुध्दीपत्र यांसह) हीच मतदार यादी असेल.

२) (अ) पूर्वगामी तरतूदींखाली सदस्यांचे नामनिर्देशन व निवडणूक झाल्यानंतर सात दिवसांत आयुर्वेद संचालक निश्चित करील अशा तारखेस, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीसाठी एक सभा बोलावण्यात येईल. ही निवडणूक गुप्त मतदानाने होईल.

(ब) खंड खाली बोलावलेल्या सभेत अध्यक्षपदी आयुर्वेद संचालक असेल आणि त्याला मतदानाचा हक्क राहील. अशा सभेच्या अध्यक्षपदी असणारा संचालक(या कलमात यानंतर ज्याचा निर्देश पीठासीन अधिकारी असा केला आहे. त्याच्यामते पुरेशी असतील अशा लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी अशी स ाभा, यथास्थित, तहकूब करण्यास नकार देऊ शकेल किंवा ती तहकूब करू शकेल.

(क)अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीत समसमान मते पडली तर, निवडणुकीचा निकाल, पीठासीन अधिकाऱ्याच्या उपस्थितीत, तो निर्धारित करील अशारितीने, चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात येईल.

(ड) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेबद्दल विवाद निर्माण झाल्यास, पीठसीत अधिकाऱ्यास, निवडणुकीच्या तारखेपासून ३० दिवसांत निर्णयाकरितात्त्या विवादाचा राज्य शासनाकडे निर्देश करता येईल. अशा विवादातील राज्यशासनाचा निर्णय, अंतिम व निर्णायक असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर हरकत घेता येणार नाही.)

**पदावधी**

५. (१) (कलमे ३ अ आणि ४ यांच्या तरतुदींनुसार) निवडणूक घेण्यात आल्यानंतर, राज्य शासन, शक्य तितक्या लवकर, शासकीय राज्यपत्रात अधिसूचना प्रसिध्द करून अध्यक्ष, (उपाध्यक्ष आणि परिषदेचे सदस्य) यांची नावे प्रसिध्द करील.

(२) पोट-कलम (१) खाली प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेत राज्य शासन, जो कालावधी विनिर्दिष्ट करील त्या कालावधीसाठी, अध्यक्ष व (उपाध्यक्ष) अधिकारपद धारण करतील. परंतु, अशा अध्यक्षांच्या किंवा (उपाध्यक्षांचा) सदस्य म्हणून पोट-कलम (३) खाली जो पदावधी असेल त्याहून असा कालावधी कमी होता कामा नये.असा पदावधी पोट-कलम (१) खाली प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेच्या तारखेपासून सुरू होईल.

(३) (परिषदेचा सदस्य) मग तो निवडून आलेला असो वा नामनिर्देशित करण्यात आलेला असो - पोट-कलम (१) खाली प्रसिध्द केलेल्या सूचनेच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या ५ वर्षाच्या कालावधीसाठी अधिकारपद धारण करील.

(ब) (४) पोट-कलम (२) किंवा (३) यात काहीही अंतर्भूत असेल तरी, मावळत्या अध्यक्षाचा,(उपाध्यक्षांचा) किंवा सदस्यांचा पदावधी हा, ज्या दिवशी अशा अध्यक्षांच्या,(उपाध्यक्षांच्या) किंवा सदस्यांच्या उत्तराधिकाऱ्यांचे नाव पोट-कलम (१) खाली प्रसिध्द करण्यात येईल, त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला आहे, आणि त्यादिवशी संपला आहे, असे मानण्यात येईल.

(५) मावळता सदस्य पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित करण्यास पात्र असेल.

(६) पोट-कलम (३) यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, शासकीय राज्यपत्रात अधिसूचना प्रसिध्द करून (परिषदेच्या) सदस्यांचा पदावधी एकूण (तीन वर्षापेक्षा) अधिक होणार नाही अशा आणखी कालावधीसाठी वेळोवेळी वाढविता येईल.

६. (१) राज्य शासनाने, नामनिर्देशित केलेला अध्यक्ष किंवा (उपाध्यक्ष) किंवा सदस्य, यांच्या नैमित्तिक मृत्यूमुळे त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला पदावरून काढून टाकल्यामुळे, तो असमर्थ झाल्यामुळे किंवा रिक्त पदे अपात्र ठरल्यामुळे किंवा कोणत्याही अन्य कारणांमुळे पदावधी संपण्यापूर्वी झालेले कोणतेही नैमित्तिक रिक्त पद राज्य शासनाने नामनिर्देर्शित करून भरले पाहिजे.

(२) नोंदणीकृत व्यवसायींनी निवडून दिलेल्या (परिषदेच्या) सदस्याचे कोणतेही असे रिक्त पद राज्य शासनाने (परिषदेने) शिफारस केलेल्या तीन नोंदणीकृत व्यवसायीच्या नामिकेतील एखाद्या व्यक्तीच्या नामनिर्देशनाद्वारे भरले पाहिजे.

परंतु, राज्य शासन निश्चित करील अशा अवधीच्या आत (परिषदेने) या पोटकलमाखाली शिफारस केली नसेल तर, रिक्त पद भरण्यासाठी, राज्य शासन कोणत्याही नोंदणीकृत व्यवसायीची नेमणूक करू शकेल.

(४) एखादे रिक्त पद भरण्यासाठी पोट-कलम (१) किंवा (२) खाली नामनिर्देशित केलेली कोणतीही व्यक्ती ही कलम ५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी ज्या सदस्याच्या जागेवर तिला नामनिर्देशित केलेले

असेल किंवा ज्याच्या जागी ती निवडण्यात आली असेल त्या सदस्याने ती जागा रिकामी झालेली नसती तर ज्या अवधीपर्यंत अधिकारपद धारण केले असते त्याच अवधीपर्यंत अधिकारपद धारण करील.

**राजीनामा :**

७.(१) निवडून आलेला सदस्य, कोणत्याही वेळी, अध्यक्षास लेखी नोटीस देऊन आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देऊ शकेल. नामनिर्देशित सदस्य कोणत्याही वेळी राज्य शासनास लेखी नोटीस देऊन आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देऊ शकेल. ज्या तारखेस असा राजीनामा, यथास्थित अध्यक्षांकडून किंवा राज्य शासनाकडून स्वीकारण्यात येईल त्या तारखेपासून तो अमलात येईल.

(२) अध्यक्ष किवा (उपाध्यक्ष) कोणत्याही वेळी राज्य शासनास लेखी नोटीस देऊन आपल्या अधिक ारपदाचा राजीनामा देऊ शकेल. ज्या तारखेस राज्य शासन असा राजीनामा स्वीकारील त्या तारखेपासून तो अमलात येईल.

**४. कामाचा निकष :**

**श्रीमती वि.वि.पुरंदरे - उपप्रबंधक**

**१)** मूळ प्रमाणपत्र व त्यांच्या छायांकित प्रती तपासणे,
२) टपाल मार्कींग करणे,
३) असेब्ली आणि लोकसभा संदर्भातील विषय,
४) लोकसभा आणि राज्यसभासंदर्भातील विषय,
५) परिषदेच्या कार्यकारी आणि सर्वसाधारण सभेच्या नोटीस, अजेंडा पाठविणे,त्याचे मिनिट्स तयार करून पाठविणे.
६) केंद्र आणि राज्य शासनाकडून आलेल्या पत्रांचे पत्रव्यवहार करणे.
७) कर्मचाऱ्यांचे रजा व इतर सर्व्हिस संदर्भातील कामकाज पाहणे.
८) प्रोव्हीजनल आणि परमनंट रजिस्ट्रेशन व परराज्यातील फॉम तपासणे.
९) ड्युप्लिकेट प्रमाणपत्र तयार करणे.
१०) माहितीचा अधिकारी
११) इतर कामकाज.

**श्रीमती र.सं.पोतदार - मुख्य लिपिक**

१) नोंदणीकृत व्यवसायिकांचे नोंद रजिस्टरमध्ये घेणे.
२) नोंदणीकृत व्यवसायिकांच्या प्रमाणपत्राचा हिशोब ठेवणे.
३) प्रोव्हीजनल आणि परमनंट रजिस्ट्रेशन व परराज्यातील फॉम तपासणे.
४) पोलिस, जिल्हाअधिकारी व इतर यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवर पत्रव्यवहार करणे.
५) नोंदणीकृत व्यवसायिकांच्या आलेल्या तक्रारी हाताळणे.
६) केंद्रीय भारतीय चिकित्सा परिषद यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रावर पत्रव्यवहार करणे.

७) नोंदणीकृत व्यवसायिकांचे रजिस्ट्रेशन रद्द करणे.
८) प्रबंधक व उपप्रबंधक यांनी सांगितलेली इतर कामे.

**श्रीमती एम.एम.शेंडे - मुख्य लिपिक :-**

१) परराज्यातील नोंदणीकृत व्यवसायिकांचे अर्ज स्विकारणे.
२) परराज्यातील नोंदणीकृत व्यवसायिकांचे अर्ज बोर्ड, विद्यापीठ व पोलिस यांच्याकडे पडताळणीसाठी पाठविणे.
३) न्यायालयीन व उच्च न्यायालयीन केसेस हाताळणे.
४) प्रबंधक व उपप्रबंधक यांनी सांगितलेली इतर कामे.

**श्रीमती एस.एस.शेठ - लेखापाल**

१) कॅशबुक, मेनकॅशबुक, पेटीकॅशबुक व सबसिडायरी तयार करणे.
२) लेजर तयार करणे.
३) भविष्यनिर्वाह निधीचे मेनकॅशबुक तयार करणे व प्रत्येक कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे अकाउन्टस् तयार करणे.
४) स्थानिक लोकल निधीचा ऑडीट रिपोर्टचा कॉम्प्लॅन तयार करणे.
५) नोंदणीकृत व्यवसायिकांची फी जमा करणे.
६) कर्मचाऱ्यांचे वेतन काढणे.
७) नोंदणीकृत व्यवसायिकांची मेडिकल लिस्टचे रजिस्टर तयार करणे.
८) इलेक्ट्रीकसिटी, टेलिफोन,दुरध्वनी व भाडे यांचे रजिस्टर तयार करणे.
९) कायम मुदतीमध्ये ठेवण्यात आलेल्या ठेवींचे रजिस्टर तयार करणे.
१०) मुद्रणालयाकडून प्राप्त झालेली देयके आयुर्वेद संचालनालयाकडे पाठविणे व पत्रव्यवहार करणे.
११) प्रबंधक व उपप्रबंधक यांनी सांगितलेली इतर कामे.

**श्री.डी.टी. साळवी - लिपिक**

१) आवक व जावक रजिस्टर.
२) प्रोव्हीजनल आणि परमनंट रजिस्ट्रेशन व परराज्यातील फॉम स्विकारणे.
३) प्रोव्हीजनल (तात्पुरत्या प्रमाणपत्रांची नोंद घेणे).
४) प्रोव्हीजनल (तात्पुरत्या प्रमाणपत्रांचा हिशोब ठेवणे व टपालखर्चाचा हिशोब ठेवणे).
५)तात्पुरत्या नोंदणी प्रमाणपत्रांच्या नोंदी घेणे.
६) अतिरिक्त अर्हताप्रमाणपत्राचे अर्ज स्विकारणे, त्याची नोंद घेणे व त्याचा हिशोब ठेवणे.
७) प्रबंधक व उपप्रबंधक यांनी सांगितलेली इतर कामे.

**५.कार्य पार पाडण्यासाठी वापरावयाचे नियम/कायदा अनर्हता,असमर्थता आणि अधिकारपदावरून काढून टाकणे :**

८. (१) पुढीलपैकी कोणतीही व्यक्ती सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नामनिर्देशित केली जाण्यास पात्र असणार नाही.

अ) अविमुक्त दिवाळखोर असेल अशी व्यक्ती;

ब) सक्षम न्यायालयाने जिला विकलमनाची म्हणून न्यायनिर्णित केले असेल अशी व्यक्ती.

क) नोंदवहीमधून जिचे नाव काढून टाकण्यात आले असेल अशी व्यक्ती; किंवा

ड) (परिषदेचा) पूर्णकालिक अधिकारी किंवा कर्मचारी असेल अशी व्यक्ती.

(२) जर कोणताही सदस्य

अ)अध्यक्षाच्या व (उपाध्यक्षांच्या) बाबतीत, राज्य शासनाच्या मते आणि कोणत्याही इतर सदस्याच्या बाबतीत (परिषदेच्या)मते पुरेशा कारणांवाचून (परिषदेच्या) लागोपाठच्या तीन बैठकीस स्वत: होऊन अनुपस्थित राहील; किंवा ब) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणत्याही निरर्हतेच्या अधिनतेने निरर्ह ठरेल किंवा ठरल्याचे आढळून येईल तर, राज्य शासन, त्याचे अधिकारपद रिक्त झाले आहे असे घोषित करील.

(३) या अधिनियमाखाली निवडून आलेला किंवा नामनिर्देशित करण्यात आलेला कोणताही सदस्य, सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडताना गैरवर्तन केल्याबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तुणकीबद्दल दोषी असेल किंवा सदस्य म्हणून आपली कर्तव्य बजावण्यास असमर्थ झाला असेल तर, राज्य शासनास, सदस्यांचा संपूर्ण संख्येच्या निदान दोन-तृतियांश संख्येइतक्या सदस्यांनी पाठींबा दिल्यानंतर (परिषदेने) केलेल्या शिफारसीवरून अशा सदस्यास काढून टाकता येईल.

परंतु, ज्या कोणत्याही सदस्यांच्या संबंधात त्यास काढून टाकण्याविषयी शिफारस करणारा कोणताही ठराव संमत करावयाचा असेल, त्या सदस्यास, अशा प्रकारे शिफारस का करण्यात येऊ नये, याबाबत कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज(परिषदेने) असा कोणताही ठराव संमत करता कामा नये.

(४) या अधिनियमाखाली आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तणुकीबद्दल अध्यक्ष किंवा (उपाध्यक्ष) दोषी असेल किंवा यथास्थिती, अध्यक्ष किंवा (उपाध्यक्ष) म्हणून आपली कर्तव्य बजावण्यास तो असमर्थ झाला असेल, तर राज्य शासनास, अशा अध्यक्षास किंवा (उपाध्यक्षास) काढून टाकता येईल.परंतु, यथास्थिती, अशा अध्यक्षास किंवा अशा (उपाध्यक्षास) त्यास अधिकारपदावरून का काढून टाकण्यात देऊ नये याबाबत कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, अशी कोणतीही कारवाई करता कामा नये.

९.(१) नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशारितीने (परिषदेच्या) बैटकी बोलावण्यात व (परिषदेच्या) बैठकी भरविण्यात येतील आणि त्याचे कामकाज चालविले जाईल.

(२) कलम ४, पोट-कलम (२) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही अध्यक्ष हा, उपस्थित असेल तेव्हा, परिषदेच्या प्रत्येक बैठकीस अध्यक्ष म्हणून काम पाहील. जर कोणत्याही बैठकीस अध्यक्ष अनुपस्थित असेल तर उपाध्यक्ष, आणि दोघेही अनुपस्थित असतील तर, उपस्थित सदस्यांनी

आपल्यामधून निवडलेल्या कोणताही अन्य सदस्य. अशा बैठकीस अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(३) (परिषदेच्या) बैठकीत उपस्थित झालेल्या सर्व प्रश्नांचा निर्णय, सभेत उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या सदस्यांच्या बहुमतानुसार घेण्यात येईल.

(४) समसमान  मते पडतील अशा बाबतीत, बैठकीत अध्यक्षाचे काम चालविणाऱ्या व्यक्तीस, दुसरे किंवा निर्णायक मत असेल आणि तो असे मत देईल.

(५) (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह, परिषदेच्या आठ सदस्यांची) मिळून गणपूर्ती होईल, जेव्हा गणपूर्ती ची आवश्यकता असेल परंतु गणपूर्ती होईल ते सदस्य उपस्थित नसतील तेव्हा अध्यक्ष म्हणून काम चालवणारी व्यक्ती अशा बैठक पुढील एखाद्या दिवसाच्या कोणत्याहि वेळेपर्यंत तहकूब करील आणि अशी वेळ तो (परिषदेच्या) कार्यालयातील सूचना फलकावर अधिसूचित करील;आणि मूळ वैठकीत गणपूर्तीइतके सदस्य असते तर त्या बैठकीत जे कामकाज आणले गेले असते ते कामकाज अशा रितीने तहकूब करण्यात आलेल्या बैठकीत आणण्यात येईल आणि असे कामकाज अशा बैठकीत किंवा अशा बैठकीनंतर तहकूब झालेल्या कोणत्याही पुढील बैठकीत निकालात काढता येईल - मग अशा बैठकीत गणपूर्ती होईल इतके स दस्य उपस्थित असोत वा नसोत.

**बैठकीत कामकाज व कृत्यांची विधिग्राह्यता**

१०.

(१)(परिषदेच्या) प्रत्येक बैठकीतील चर्चेच्या कामकाजाबाबत गुप्तता राखण्यात येईल आणि (परिषदेने ) आधी ठराव केल्याशिवाय, कोणतीही व्यक्ती अशा कामकाजाचा कोणताही भाग उघड करणार नाही.

परंतु या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे (परिषदेने) स्वीकृत केलेल्या कोणत्याही ठरावातील मजकूर उघड करण्यास किंवा प्रसिध्द करण्यात कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंध होतो असे समजले जाणार नाही. मात्र , ( परिषदेने)  असा ठराव गुप्त राखण्यात यावा असा निर्देश दिला नसला पाहिजे.

(२) सदस्य म्हणून किंवा अध्यक्ष म्हणून किंवा (उपाध्यक्ष) म्हणून किंवा बैठकीत अध्यक्षांचे काम चालविणारा अधिकारी म्हणून असलेली कोणतीही व्यक्ती निरर्ह ठरेल किंवा तिच्या निवडणुकीत, नामनिर्देशनात किंवा नेमणूकीत दोष होता, केवळ याच गोष्टीमुळे (परिषदेच्या) ज्या कोणत्याही कृत्यात किंवा कामकाजात अशा व्यक्तीने भाग घेतला असेल ते कृत्य किंवा ते कामकाज सदोष होते असे मानता कामा नये. मात्र, अशा कृत्यात किंवा कामकाजात भाग घेणाऱ्या बहुसंख्य व्यक्तींना मत देण्याचा हक्क असला पाहिजे.

(३) (परिषदेत) कोणतेही पद रिक्त असताना पदावर असलेल्या सदस्यांना जणू असे पद रिकामे झाले नाही असे समजून काम चालविता येईल परंतु अशा रिक्त पदांची संख्या कोणत्याही वेळी सहापेक्षा अधिक असता कामा नये.

**(बैठकीसाठी) द्यावयाची फी व भत्ते**

११.अध्यक्षास, (उपाध्यक्षास) आणि (परिषदेच्या) इतर सदस्यांना ( आणि त्यांच्या समित्यांच्या सदस्यांना व कलम १७, पोटकलम (७) मध्ये निदिष्ट केलेल्या प्राधिकरणाच्या सभापतीस व सदस्यांना) बैठकीस हजर राहण्यासाठी नियमांद्वारे वेळोवेळी विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते आणि वाजवी प्रवास भत्ता देण्यात येईल.

**(परिषदेचे) उत्पन्न व खर्च**

१२. (१) (परिषदेच्या) उत्पन्नात पुढील बाबी समाविष्ट असतील :-

(अ) व्यवसायीकडून मिळालेली फी,

(अ-१) परीक्षार्थीकडून मिळालेली फी,

(अ-२) परिषदेने वसूल केलेली कोणतीही अन्य फी,

(ब) राज्य शासनाकडून मिळालेली अनुदाने कोणतीही असल्यास, आणि,

(क) परिषदेस मिळालेल्या देणग्या व कोणत्याही अन्य रक्कमा.

(२) पुढील प्रयोजनासाठी (परिषद) खर्च करण्यास सक्षम असेल, ती म्हणजे—

**(अ) प्रबंधकाचे व (परिषदेने) ठेवलेल्या कर्मचारीवर्गाचे (तसेच निरिक्षकाचे) वेतन व भत्ते**;

(ब) (परिषदेच्या) (किंवा तिच्या समितीच्या (तसेच अभ्यास मंडळाच्या) किंवा कलम १७ पोट-कलम (७) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अपील प्राधिकरणाच्या) सदस्यांना दिलेली फी व भत्ते.

(ब-१) परीक्षा घेण्याकरिता परिषदेने नेमलेल्या प्राश्निकांना व परीक्षकांना, नियामकांना आणि इतर व्यक्तींना देण्यात आलेले पारिश्रमिक;

(ब-२) परीक्षा घेण्यासाठी येणार इतर खर्च.

(क) या अधिनियमाखाली परिषदेने आपली कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असेल असा इतर खर्च.

१३. *** *** ***

**परिषदेचे अधिकार , कर्तव्ये व कार्ये**

१४. या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये किंवा त्याखाली विहित करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीनतेने (परिषदेचे) अधिकार, कर्तव्ये व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :-

अ) व्यवसायींची नोंदणी करण्यासाठी तरतूद करणे आणि नोंदवही ठेवणे.

ब) प्रबंधकाच्या कोणत्याही निर्णयावर केलेल्या अपिलाची सुनावणी करणे व त्याचा निर्णय करणे.

क) नोंदणीकृत व्यवसायींच्या व्यावसायिक आचरणाचे विनियमन करण्यासाठी नैतिक आचारसंहिता विहित करणे;

ड) नोंदणीकृत व्यवसायीवर ताशेरे झाडणे, त्याचे नाव नोंदवहीतून निलंबित करणे

किंवा काढून टाकणे किंवा त्यांच्याविरूध्द (परिषदेच्या) मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशी इतर शिस्तभंगाची कारवाई करणे;

ई)परीक्षा घेणे आणि अशा परीक्षांसाठी आवश्यक अशी सर्व व्यवस्था करणे;

फ)महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, १९८२ याच्या प्रारंभ दिनांकाच्या लगतपूर्वी जे प्रशिक्षण पाठ्यक्रम शाखा चालवीत असेल असे प्रशिक्षण पाठ्यक्रम व परिषदेच्या परीक्षांची तयारी करून घेणारे भारतीय वैद्यक केंद्रीय परिषद अधिनियम, १९७० यांचा कलम ३६ खंड (एक) खाली केलेल्या विनियमांद्वारे मध्यवर्ती परिषद विहित करील असे इतर पाठ्यक्रम चालवणे व अशा परीक्षांसाठी फी आकारणे.

ग)पदव्युत्तर प्रशिक्षणाची तरतूद करणे.

ह) पदव्या, पदविका आणि मानचिन्हे देणे;

आय) विद्यावेतने, शिष्यवृत्या, पदके, पारितोषिके आणि इतर बक्षीसे देणे;

जे) परिषदेच्या परीक्षांची तयारी करून घेणाऱ्या पाठ्यक्रमांसाठी शिक्षण देण्याच्या प्रयोजनाकरिता परिसंस्थाना मान्यता देण्याची शिफारस करणे किंवा अशी मान्यता रद्द करण्याची शिफारस करणे.

के) अनुसूचीमध्ये कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्रे किंवा बक्षीसे देणे;

ल) पाठ्यपुस्तके तयार करणे, प्रकाशित करणे, आणि विहित करणे आणि विहित अभ्यासक्रमाची विवरणे प्रसिध्द करणे;

म) भारतीय औषधपध्दतीच्या व्यवसायासाठी आवश्यक असलेला नैपुण्याचा पुरेसा दर्जा राखण्याची तरतूद करणे.

न) भारतीय औषध पध्दतीमधील संशोधनासाठी तरतूद करणे.

ओ) मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या निरीक्षणाची तरतूद करणे आणि अशा परिसंस्थांना आवश्यक असेल अशी माहिती पुरवण्यास भाग पाडणे.

प) अनुसूचीत समाविष्ट करण्यात आलेल्या अर्हतांपैकी कोणत्याही अर्हतेसाठि शिक्षण देणाऱ्या कोणत्याही अन्य परिसंस्थांचे निरीक्षण करण्याची तरतूद करणे;

क्यू) ज्या व्यक्ती परिषदेच्या सदस्य असतील किंवा सदस्य नसतील अशा व्यक्तींचा समावेश असलेली अभ्यासमंडळे आणि समित्या नेमणे परंतु अशा व्यक्तीपैकी निम्म्या व्यक्ती कलम ३४, पोटकलम (१) मध्ये नमूद केल्ल्या कायद्यापैकी कोणत्याही कायदयाखाली नोंदणी केलेल्या वैद्यक व्यवसायी असतील - आणि अशा मंडळांची आणि समित्यांची रचना, कर्तव्य आणि कार्य नेमून देणे.,

(र) राज्य शासनाच्या मान्यतेच्या अधीनतेने देणग्या स्वीकारणे आणि देणग्या स्विकारण्यासंबधीच्या शर्ती निर्धारित करणे.

(स) या अधिनियमात घालून देण्यात आलेल्या असतील असे किंवा नियमाद्वारे विहित करण्यात येतील असे इतर अधिकार वापरणे आणि अशी इतर कर्तव्ये व कार्ये पार पाडणे.

१५. *** ****** *******

१६.(१) राज्य शासन (परिषदेशी) विचारविनिमय करून प्रबंधकाची नेमणूक करेल. प्रबंधक व (परिषदेचा) कार्यकारी अधिकारी असेल. प्रबंधकाचे वेतन, भत्ते आणि इतर सेवेच्या शर्ती या राज्य (परिषदेचा) शासनाकडून विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(२) (परिषदेस) वेळोवेळी प्रबंधकाला रजा मंजूर करण्यात येईल परंतु जर रजेचा कालवधी दोन महिन्यांहून अधिक नसेल तर अध्यक्षांस रजा मंजूर करता येईल.

(३) रजेवर गेल्यामुळे किंवा इतर कोणत्याहि कारणांमुळे प्रबंधकाच्या पदाची अशाप्रकारे कोणतीही जागा तात्पुरती रिकामी झाली असेल तर (परिषदेस) राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने त्यांच्या जागी काम करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशारितीने नेमणूक केलेली कोणतीही व्यक्ती अशा नेमणूकीच्या कालावधीसाठी या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता प्रबंधक आहे असे मानण्यात येईल. परंतु, अशा रिक्त पदाचा कालावधी दोन महिन्यांहून अधिक होत नसेल तेव्हा अध्यक्षास नेमणूक करता येईल आणि तो अशी नेमणूक ताबडतोब राज्य शासनाला कळवील.

(४) राज्य शासनास (परिषदेशी) विचारविनिमय केल्यानंतरच प्रबंधक म्हणून नेमणूक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस निलंबित करता येईल, बडतर्फ करता येईल किंवा काढून टाकता येईल किंवा त्याला इतर कोणतीही सक्ती लादता येईल.

(५) (परिषद) या अधिनियमाखाली आपले कर्तव्य बजावण्यासाठी व कार्य पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटते असे इतर अधिकारी व कर्मचारी वेळोवेळी नेमील.परंतु, अशा अधिकाऱ्याची व कर्मचाऱ्यांची संख्या, पदनामे आणि त्यांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

(६) प्रबंधक आणि या कलमाखाली नेमलेला अधिकारी किंवा कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम(२१) च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत असे मानण्यात येईल.

**परिषदेची कार्यकारी समिती**

१६-अ (१) (परिषद) शक्य होईल तितक्या लवकर पदसिध्द सदस्य या नात्याने अध्यक्ष व नियमांन्वये विहित करण्यात येतील इतके (परिषदेने) आपल्या सदस्यामधून निवडलेल्या इतर सदस्य यांचा समावेश असलेली एक कार्यकारी समितीची स्थापना करतील.

(२) कार्यकारी समितीच्या सदस्यांचा पदावधी, त्यांच्यामध्ये अकस्मितरित्या रिक्त झालेली पदे भरण्याची रीत व त्यांना अनुसरावयाची कार्यपध्दती ही नियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) या अधिनियमांन्वये देण्यात आलेले अधिकार, लादण्यात आलेली कर्तव्ये व सोपविण्यात आलेली कार्ये याशिवाय कार्यकारी समिती नियमाद्वारे तिच्याकडे प्रत्यायोजित करण्यात येतील किंवा(परिषदेकडून) वेळोवेळी तिच्याकडे सोपविण्यात येतील अशा (परिषदेच्या) अधिकाराचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडतील.

१६-ब) *** *** ****

**प्रदर्शित करावयाची पध्दत**

| वार्षिक अहवाल | कार्यक्रम अहवाल | अंदाजपत्रकीय दस्तऐवज | वृत्तपत्र | इतर(निर्देशित करावे) |
|---|---|---|---|---|
| **स्वायत्त संस्था** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** | **निरंक** |

**६. विभागामधील कागदपत्रांच्या वर्गवारीचे विवरणपत्र**

परिषदेतील दफ्तरी या विभागातील कागदपत्रांचे जतन करतो.

**७. धोरण तयार करण्याच्या किंवा अंमलबजावणी प्रक्रीयेमध्ये जनतेच्या सहभागासाठी केलेल्या उपाययोजना.**

माहितीचा अधिकार २००५ अन्वये सहकार्य.

**८. सल्ला देण्यासाठी स्थापन केलेले मंडळे, समिती - परिषद याबाबतची माहिती**

सल्ला देण्यासाठी स्थापन केलेले मंडळ निरंक असून परिषदेच्या कार्यकारी समिती,सर्वसाधारण समिती , पडताळणी समिती व इतर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | पदे | सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. | प्रबंधक | १००००-३५०-१५२०० |
| २. | उपप्रबंधक | ६५००-२००-१०५०० |
| ३. | वरिष्ठ लिपिक | ४०००-१००-६००० |
| ४. | लघुटंकलेखक | ५०००-१५०-८००० |
| ५. | लैखापाल | ५०००-१५०-८००० |
| ६. | लिपिक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ७. | मराठी टंकलेखक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ८. | दफ्तरी | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |
| ९. | शिपाई | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |

**१०.प्रत्येक कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, नुकसान भरपाई कार्यपध्दती :**

| | मासिक वेतन |
|---|---|
| १.प्रबंधक | (अतिरिक्त कार्यभार) |
| २.उपप्रबंधक | रू.७,१००/- |
| ३.वरिष्ठ लिपिक | रू.५,३००/- |
| ४.लिपिक | रू.३,३५०/- |
| ५.लेखापाल | रू.४,३००/- |
| ६.दफ्तरी | रू.२,७९०/- |
| ७.शिपाई | रू.३,२००/- |

**नुकसान भरपाईची कार्यपध्दती :**

प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वसूली.

**११.सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च अर्थसंकल्प, संवितरीत रक्कम :**

**१.सर्व योजनांचा तपशील -** परिषद ही स्वायत्त संस्था असून परिषदेचे कार्य आयुर्वेदिक व युनानी नोंदणीकृत व्यवसायिकांना प्रमाणपत्र देण्याचे असून प्रत्येक नोंदणी कृत व्यवसायिकांकडून परिषदेने व शासनाने ठरवून दिलेले शुल्क आकारण्यात येऊन प्राप्त झालेल्या शुल्कामध्ये परिषदेचे सर्व कामकाज

पार पाडण्यात येते. परिषदेला शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जात नाही. परिषदेचा दरवर्षीचा प्रत्यक्ष जमाखर्च व अर्थसंकल्प परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मांडण्यात येतो व त्याची मंजुरी घेण्यात येते तसेच शासनाच्या महाराष्ट्र शासन वित्त विभाग, स्थानिक निधी लेखा मुंबई विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, ६ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४ यांच्याकडून करण्यात येते.

**१२.सबसीडीचे कार्यक्रम, पध्दत रकमा, लाभार्थबाबतची माहिती :**

परिषद ही स्वायत्त संस्था आहे.

**१३.ज्या व्यक्तींना सवलीती,परवाने प्राधिकरणपत्रे दिली आहेत त्याचा तपशील**

परिषद ही स्वायत्त संस्था आहे.

**१४. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असलेली माहिती :**

निरंक

**१५. लायब्ररीसह नागरिकांना माहिती मिळण्यासाठी दिलेल्या सुविधा :**

निरंक

**१६. माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांची नावे व पदनामे:**

माहिती अधिकारी : श्रीमती वि.वि.पुरंदरे - उपप्रबंधक

अपिलिय अधिकारी : डॉ.दिलीप उ.वांगे - प्रभारी प्रबंधक

**१७. इतर माहिती :** ही स्वायत्त परिषद आहे. एम.एम.पी.ॲक्ट १९६१ प्रमाणे ही परिषद आयुर्वेद व युनानी या पदवीधारकांना तात्पुरते व कायम वैद्यकीय प्रमाणपत्रे देण्याचे कार्य करते.